**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ५८/२०१९**

तक्रारकर्ता, श्री.भास्कर रघुनाथ गालट,
रा.हनुमान नगर, लहान उमरी, अकोला, ता.जि.अकोला.

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**मंगरुळपीर चार्ज- वाशिम, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे कार्यालय, ता.जि.वाशिम**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक,**
**पोलीस अधिक्षक यांचे कार्यालय, वाशिम, ता.जि.वाशिम**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.०८.२०२४.**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |

तक्रारकर्ता यांनी दि.१५.०७.२०१९ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, दि.२६.०४.२०१९ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच माहिती देखील पुरविली नाही, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२२.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. निलीमा आरज ह्या उपस्थित आहेत.

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०४.२०१९ रोजी रितसर माहितीचा अर्ज दाखल करुन, पोलीस स्टेशन मालेगांव, येथे ठेवण्यात आलेले व कार्यरत असलेले सी.सी.टी.एन.एस. सीस्टम वरील दि.२०.०२.२०१९ ते अभिलेख तपासणीची परवानगी मिळाल्यानंतर अभिलेख तपासणीच्या दिनाकांस सुरु होवून त्या तारखेपर्यंतचे अभिलेख तसेच यात गुन्ह्या संदर्भात घेण्यात आलेल्या नोंदी, स्टेशन डायरीच्या छायांकीत प्रती, इत्यादी माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसाच्या विहीत मुदतीत माहितीचे प्रदान न झाल्याने तक्रारकर्त्याने आयोगाकडे थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निर्दशनास येते की, तक्रारकर्ता श्री.भास्कर गालट यांनी

दि.२९.०४.२०१९ रोजी तत्कलीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी येथे जोडपत्र-अ अन्वये एकूण ९ मुद्यांची माहिती मागितली असून, त्यात पोलीस स्टेशन मालेगांव, येथे ठेवण्यात आलेले व कार्यरत असलेले सी.सी.टी.एन.एस. सीस्टम वरील दि.२०.०२.२०१९ ते अभिलेख तपासणीची परवानगी मिळाल्यानंतर अभिलेख तपासणीच्या दिनाकांस सुरु होवून त्या तारखेपर्यंतचे अभिलेख तसेच यात गुन्ह्या संदर्भात घेण्यात आलेल्या नोंदी, स्टेशन डायरीच्या छायांकीत प्रती, इत्यादी माहिती मागितली असून पोलीस स्टेशन, मालेगांव येथे दि.२०.०२.२०१९ ते दि.२२.०२.२०१९ या कालावधीत मंजुर तैनात संख्याबळ अधिकारी/कर्मचारी त्यांचे संपूर्ण नाव व माहिती इत्यादी बाबी मागीतल्या असून, तत्कलीन जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस अधिक्षक, उपविभाग वाशिम यांनी मुद्या क्र. १ ते ६ म्हणजे सी.टी.एन.एस. सीस्टम वरील अपेक्षीत असणारी माहिती ही कलम ८ (ज) नूसार देता येणार नसल्याचे अपिलार्थीस कळविले व मुद्या क्र. ७ ते ९ यात पोलीस स्टेशन, मालेगांव यांचेवतीने जावक क्रमांक ४१७/१९ अन्वये माहिती पुरविली असल्याचे नमूद केले. यातील सी.सी.टी.एन.एस. मधील माहिती ही गोपनिय दस्तऐवज असल्याने तसेच कलम ८ (१) (ज) च्या तरतुदी लक्षात घेता, नाकारण्यात आले असल्याचे आढळून येतात. त्याविरुध्द अपिलकर्ता श्री.गालट यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर अपिलकर्ता यांना माहिती पुरविली असली तरी त्यांनी ती स्विकारली नसल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम यांचे कार्यालयात परत प्राप्त झाली असून, याविरुध्द अपिलकर्ता श्री.गालट यांनी थेट तक्रार अर्ज आयोगासमोर दि.१५.०७.२०१९ रोजी दाखल केला असून, यात उपलब्ध असलेली माहिती ही जाणून बुजुन नाकारली असल्याचा आक्षेप घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी संबंधीत प्राधिकरणाकडून खुलासा मागविण्यात आला व तो प्राप्त देखील झालेला असून, यात अपिलकर्ता यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती याआधिच प्रदान केलेली आढळून येते. तसेच मुद्या क्र. १ ते ६ याबाबतीत कलम ८ (१) (ज) नूसार त्यांनी याआधिच दि.२५.०६.२०१९ सविस्तर प्रतिसाद दिलेला आहे. वरील वस्तुस्थिती लक्षात घेता, वरील तक्रार अर्ज हा तथ्यहीन आढळून येतो. तसेच यात नमूद केलेल्या सर्व बाबी मागितलेल्या माहितीची कालबाह्यत: व अपिलकर्ता यांनी आज झालेल्या सुनावणीस हजर देखील न राहणे ही बाब अपिलकर्ता यांना उपरोक्त माहिती प्राप्त करुन घेण्यास कुठलेही स्वारस्य नसल्याचे दर्शविणारे असून, प्रस्तुत तक्रार अर्ज तथ्यहीन असून, फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार फेटाळण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २२.०८.२०२४**

जावक क्रमांक ७७५८ दिनांक 30 OCT 2024

निर्गमित केले 30 OCT 2024

Vishal D. Ingale-२०२४/